# " स्वाईन फलु"

## आपत्ती व्यवस्थापना अंतर्गत नागरीकांची भुमिका

डॉ. एस.एम.जाधव,

जिल्हा सर्वेक्षण अधिकारी, नांदेड



# सद्य: परिस्थीतीचा आढावा

जागतिक परिस्थीती (१२/८/२००९ अखेर):

- बाधित देशांची संख्या : १६८
- निश्चित निदान झालेली रुग्ण संख्या : १७७४५७
- एकुण मृत्यु : १४६२

- भारतीय परिस्थीती (१४/८/२००९,९:२३ वा. अखेर):
- निश्चित निदान झालेली रुग्ण संख्या : 1283
- एकुण मृत्यु : २३
- भारतात एकुण ५००० व्यक्तींची प्रयोगशाळा तपासणी करण्यात आली असुन त्यापैकी १०७८ निदान निश्चीत झालेल्या रुग्णापैकी ५८९ रुग्ण रुग्णालयातून पुर्णत: बरे होऊन घरी परत गेले आहेत.
- पुणे शहरात संसर्गाने घाबरुन सुमारे ११,००० व्यक्तींनी वैद्यकीय तपासणी करुण घेतली त्यापैकी ३३३ रुग्णांना फक्त स्वाईन फल्यु झाल्याचे स्पष्ट झाले असुन २५४ रुग्ण ठणठणीत बरे झाले आहेत.



World Map as on 12.08.2009

confirmed death and infections

confirmed infections

Unconfirmed  infections

# पॅन्डेमिक हाय अलर्ट

- अांतरराष्ट्रीय आजारामध्ये सर्वात वेगाने पसरणारा
- सर्व राष्ट्रामध्ये पसरण्याची क्षमता असलेला

# फलु उद्रेकांचा जागतीक पुर्व इतिहास









**1918:**
**“स्पॅनिश फलु”**

**1957:**
**“ऐशियन फलु ”**

**1968:**
**“हॉककॉग फलु”**

**2004-07:**
**उद्रेक**

# जागतिक आरोग्य संघटने नुसार उद्रेकातील टप्पे

| उद्रेकातील टप्पे | विवरण |
|---|---|
| फेज – १ | प्राण्यामधिल प्रसारीत होणारा विषाणू मनुष्यामध्ये संसर्ग नाही |
| फेज – २ | पाळीव प्राण्यांमधिल विषाणू मनुष्यास संसर्ग करु शकतात. |
| फेज – ३ | प्राणीजन्य किंवा मनुष्यामधिल विषाणुमधुन तुरळक रुग्ण आढळतात परंतु मोठया प्रामाणात नाही. |
| फेज – ४ | मनुष्याला संसर्ग समाजात दिसुन येतो |
| फेज – ५ | वरील प्रमाणे प्रसार १ किंवा १ पेक्षा जास्त देशामध्ये परंतु जागतिक आरोग्य संघटनेच्या एका विभागामध्ये संसर्ग |
| फेज – ६ | वरील प्रमाणे संसर्ग परंतु जागतिक आरोग्य संघटनेच्या एका पेक्षा जास्त विभागामध्ये |

# इन्फलूएन्झा – ए (एच १ एन १)

- इन्फुएन्झा – ए (एच १ एन १) या अधिसंक्रमीत विषाणू पासून हा आजार होतो.

आजाराची लक्षणे :

इतर सर्दी/फल्यू सारखी सर्दी ताप, घशात दुखणे, खोकला, डोकं दुखने, अंग दुखने अशी लक्षणे असतात.

तथापी कांही रुग्णांमध्ये तीन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी तीव्र ताप, उल्टी, जुलाब, धाप लागणे अशी तीव्र लक्षणे आढळून येतात.



# संशयीत रुग्णांची परिभाषा

- श्वसन संस्थेची लक्षणे असलेली अशी व्यक्ती, एच१ एन१ रोग निदान निश्चीत झालेल्या रुग्णांचे ७ दिवस पर्यंत सानिध्यात आला असल्यास किंवा एच१ एन१ निश्चित निदान झालेले १ किंवा जास्त रुग्ण असलेल्या देशात वास्तव्यास असल्यास किंवा प्रवास केल्यास.
- अशा संशयीत रुग्णांना रुग्णांलयातील विलगीकरण कक्षात भरती करुन प्रयोग शाळा तपासणी व उपचार करणे आवश्यक आहे.

# निश्चित निदान

- श्वसन संस्थेची लक्षणे आढळलेली व्यक्तीची (WHO व्दारा पुरस्कृत प्रयोग शाळेत)
- खालील पैकी १ किंवा जास्त चाचणी पॉजीटीव्ह असणे

१ Real Time PCR (Polychain Reaction)

२ Viral Culture

3 4 Fold rise of antibodies specific to H1N1

# साथीचा प्रसार



- प्रामुख्याने हवेतुन (उदा. थुंकी, शिंकणे, खोकला व बोलण्यातुन)
- स्पर्शा व्दारे(खुर्ची,टेबल टॉप,कि बोर्ड, माऊस,हॅन्डल्स,कठडे व टेलीफोन)
- मांस खाल्याने संसर्ग होऊ शकतो का?

  उत्तर- नाही

# मनुष्याची रोगा विषयी संवेदन शिलता



- सर्व वयोगटातील व पुरुष तसेच स्त्रीया यांना लागण होऊ शकते.
- मृत्युचा / रोग बळावण्याचा धोका जास्त असलेल्या व्यक्ती- वयोवृध्द, १८ महिण्याखालील मुले, गरोदर स्त्रीया मधुमेह/ह-दय, विकार/किडनी विकार/यकृत विकार व श्वसन विकार असलेल्या व्यक्ती तसेच रोगप्रतिकारक शक्ती कमी असलेल्या (एचआयव्ही बाधीत) व्यक्ती
- स्थलांतर, प्रवासामुळे प्रसाराची शक्यता वाढते.

# वातावरणातील घटक

भारत : उन्हाळा

उत्तरीय गोलार्ध : हिवाळा

दक्षिण गोलार्ध : पावसाळा

## गर्दीचे ठिकाणी प्रसाराची तिव्रता जास्त असते

उदा- शाळा, महाविद्यालय, जहाज,विमान,सिनेमा हॉल, फॅक्ट्री इत्यादी

# अधिशयन काळ

18-72 तास

# तुमच्या भागात स्वाईन फलु रुग्ण आढळल्यास व तुमच्या मध्ये फलु सदृश्य लक्षणे दिसुन आल्यास काय कराल ?

- त्वरीत डॉक्टरांशी संपर्क साधावा.
- लहान मुलामधिल **धोक्याची लक्षणे** खालील प्रमाणे

१. श्वसन गती वाढणे अथवा श्वसन दाह

२. त्वचा निळसर पडणे

३. आहार खालवणे

४. सतत झोपुन राहाणे

५. चिडचिड पणा करणे

६. तापासह अंगावर पुरळ येणे

- प्रौढ व्यक्तीमधिल **धोक्याची लक्षणे** खालील प्रमाणे

१. श्वसन दाह / श्वसनाची गती मंदावणे

२. छातीमध्ये, पोटा मध्ये दुखणे

३. आचानक चक्कर येणे

४. शुध्द हरपणे

५. सतत व तिव्र उलटीचा त्रास

# रोग निदान



प्रयोगशाळा तपासणीसाठी नाक व घशातील स्त्रावाचे नमुने राष्ट्रीय विषाणु संस्था, पुणे येथे पाठवले जातात.






# उपचार

## टॅमीफलु गोळी / औषध

# प्रतिबंध

- लस उपलब्ध होण्यास ३ ते ४ महिण्याचा कालावधी लागु शकतो

# सर्वसाधारण घ्यावयाची प्रतिबंधक खबरदारी

- सर्दी खोकल्याचे आजारी असलेल्या रुग्णांशी नजिक संपर्क टाळावा.
- आजारी रुग्णांपासुन लांब राहावे.
- रुग्णाने खोकलतांना, शिंकतांना तोंडावर रुमाल अथवा टिश्युपेपर धरावा.





- आजारी असल्यास शक्यतो घरी राहावे व इतर रुग्णांना घरी राहण्यास प्रोत्साहीत करावे. महाराष्ट्रामध्ये पुणे येथे सर्वात जास्त रुग्ण आढळून येत असल्याने शक्यतो पुणे शहरासाठीचा प्रवास टाळावा. तसेच पुणे शहरात शाळा व महाविद्यालय बंद झाली असल्यामुळे विद्यार्थी मुळ रहिवासाच्या ठिकाणी परत येत आहेत. त्यामुळे अशा विद्यार्थ्यास अथवा व्यक्तीस फलु सदृश्य लक्षण दिसुन आल्यास त्वरीत आरोग्य संस्थेस तपासणी करीता आणावे.
- पुणे येथील प्रवास टाळणे अशक्य असल्यास गर्दीच्या ठीकाणी जाण्याचे टाळावे. तसेच तोंडावर रुमाल अथवा मास्कचा वापर करावा




- तोंडावर व नाकावर रुमाल बांधावा मास्क (एन-९५) बांधल्यास उत्तम
- वरचेवर साबणाने हात स्वच्छ धुवावे.
- भरपूर पाणी व सकस आहार घ्यावा.
- जिवनसत्व ‘अ’ (गाजर, शेवग्याच्या शेंगा / पाला, बिट, पपई, दुध,अंडी व मासे) व ‘क’ (लिंबु,संत्री, आवळा, टोमॅटो, स्ट्रॉबेरी, हिरव्या पालेभाज्या व सफरचंद ) यांचा समावेश प्रामुख्याने आहारात ठेवावा.
- पुरेशी झोप व विश्रांती घ्यावी.
- ताण तणाव टाळावा .
- आजारपणात त्वरीत वैद्यकीय उपचार घ्यावा.



- सार्वजनिक गर्दीची ठिकाणे (उदा. सिनेमा हॉल, मार्केट इत्यादी) टाळावे.
- बाधीत देशात पर्यटण शक्यतो टाळावे.
- फलुसदृश्य लक्षणे दिसुन आल्यास आजार लपवण्याचा प्रयत्न करु नये.
- हस्तांदोलन टाळावे.
- उघडयावर थुंकणे टाळावे.
- डॉक्टरांच्या सल्याशिवाय औषधी घेऊ नये.
- अफवांवर विश्वास ठेऊ नये.

# शाळा व महाविद्यालयांसाठी मार्गदर्शक सुचना

(संदर्भ स्वास्थ व परिवार कल्याण मंत्रालय भारतसरकारचे पत्र क्र. डी ३२०२०/ ५/२००९-ईएमआर)

## पार्श्वभुमी- महाराष्ट्र व दिल्ली राज्यामध्ये आढळुण आलेल्या शाळा व माहाविद्यलयातील इन्फल्युंएन्झा ए-एच१एन१ च्या केसेस

- कोणताही विद्यार्थी,कर्मचारी वर्गात फलु सदृश्य लक्षणे आढळल्यास त्वरीत त्यास ७ ते १० दिवस घरी राहाण्यास सांगावे.
- विद्यार्थी अथवा कर्मचा-यास वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्या विषयी आग्रह करुणये
- संशयीत रुग्णाच्या सहवासात आलेल्या मुलांच्या व कर्मचारी वर्गाच्या प्रकृतीवर लक्ष ठेवावे अशा व्यक्तीस फलु सदृश्य लक्षणे दिसुन आल्यास त्यांना वर नमुद केल्या प्रमाणे घरी राहाण्या विषयी सांगावे.
- रुग्णाचे निदान निश्चित झाल्यास त्वरीत त्याच्या संपर्कात येणा-या सहवासीतांची यादी पुर्ण पत्त्यासह निश्चित करुन आरोग्य संस्थेस सादर करावी.
- सहवासीत बाहेरच्या जिल्हयात स्थलांतरीत झाल्यास तश्या प्रकारे आरोग्य संस्थेस माहिती देऊन पाठपुरावा करावा.



- ज्या ठिकाणी मुले वस्तीगृहामध्ये राहातात तेथे मुलांसोबतच तेथील काळजी वाहु कर्मचारी वर्गाच्या प्रकृतीवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे .त्यांना मास्कचा वापर तसेच हात वारंवार साबण व पाण्याने स्वच्छ धुण्याविषयी सांगावे.
- अशा संशयीत व्यक्तींची माहिती तात्काळ आरोग्य संस्थेस कळवावी.
- संशयीत रुग्णाच्या पार्श्वभुमीवर शाळा / महाविद्यालय बंद ठेवण्याचा निर्णय संबधीत संस्था व जिल्हा प्रशासनाने घ्यावयाचा आहे.

# पुर्वीचा इतिहास : कन्सास येथील लष्करी छावणीतील १९१८ ची परिस्थिती



# आजची स्थिती

## घाबरू नका, स्वाईन फ्लूचे १२१० रुग्ण बरे होऊन गेले घरी

पुणे, दि.१२ (प्रतिनिधी)- स्वाईन फ्लूच्या संसर्गाने घाबरलेल्या सुमारे ११ हजार पुणेकरांनी तपासणी करून घेतल्या त्यापैकी १२१० रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. आज नवीन ३५० संशयित रुग्णांपैकी २९ जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत.

आजच्या २९ रुग्णांपैकी २७ रुग्ण डॉ.नायडू रूग्णालयात, ०१ ससून रूग्णालय आणि ०१ औंध रुग्णालयात आहेत. ससून रुग्णालयातील एच१एन१ अतिदक्षता विभागामध्ये ६ रूग्ण अत्यवस्थ आहेत. आजपर्यंत एकूण ३३३ पॉझिटिव्ह रूग्ण आढळले त्यापैकी २५४ रुग्ण ठणठणीत बरे झाले आहेत. अशी माहिती जिल्हाधिकारी चंद्रकांत दळवी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, " तपासणीसाठी वाढता ओघ लक्षात घेऊन शहरातील तपासणी केंद्राची संख्या वाढविण्यात आली आहे. यामध्ये पुणे २३, पिंपरी चिंचवड ८, खडकी ०३ आणि कॅन्टोन्मेंट २ अशी एकूण ३६ केंद्रे कार्यान्वित केली आहेत. याव्यतिरिक्त सह्याद्री-मुनोत, भारती हॉस्पिटल आणि केईएम रुग्णालयात तपासणी करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त १३ ग्रामीण रुग्णालयांमध्ये टॅमी फ्लू साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे."

स्वाईन फ्लूचा संसर्ग गेल्या काही दिवसांपासून वेगाने होत आहे. या संसर्गामुळे १३ वर्षाचा रिदाचा बळी घेतला आणि सर्वांचे धाबे दणाणले.

या दरम्यान जहांगीर रुग्णालयावर प्रचंड टीका झाल्याने खासगी डॉक्टरांनी तपासणी करण्यास नकार दिला. त्यामुळे डॉ.नायडूमध्ये प्रचंड गर्दी वाढल्याने आरोग्य प्रशासनाने शहरात नवीन २२ तपासणी केंद्रे सुरू केली. या केंद्रावर गेल्या काही दिवसांमध्ये प्रत्येक दिवशी १० हजारांपेक्षा जास्त जणांनी तपासणी करून घेतल्या आहेत. त्यापैकी ३३३ रुग्णांना फक्त स्वाईन फ्लू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. अजून तपासण्या सुरू आहेत.

# आजची स्थिती

# काळजी घेतल्यावर मी झाले ठणठणीत बरी!

## ‘स्वाईन फ्लू’तून मुक्त झालेल्या मुलीचे मनोगत

पुणे, दि. १२ (प्रतिनिधी)– ‘अगं ताई नुकतीच मी डॉ. नायडू हॉस्पिटलमधून ठणठणीत बरी होऊन आलेय... ७ दिवस आम्ही फ्रेंडस मिळून खूप मज्जा केली, पण घरी आल्यापासून जाम बोअर होतंय..त्यापेक्षा नायडूमध्ये खूप छान वाटत होते गं...स्वाईन फ्लू ची प्रिकॉशन घेतल्या ना की तो ठणठणीत बरा होतो!’ सिम्बायोसीस शाळेतील स्वाईन फ्लूमधून बऱ्या झालेल्या मुलींनी या भावना व्यक्त केल्या.

स्वाईन फ्लूमुळे पुणे शहरात नागरिकांमध्ये प्रचंड भीती निर्माण झालेली आहे. मात्र या संसर्गजन्य रोगाविषयी धास्ती न बाळगता दक्षता घेतल्यास हा आजार पूर्णपणे बरा होतो, असा अनुभव अनेक रुग्णांना आलेला आहे. याविषयी सिम्बायोसीस शाळेतील स्वाईन फ्लू बाधित विद्यार्थी व त्यांच्या पालकांशी संवाद साधला.



मुक्ता बर्वे

मुक्ता बर्वे म्हणाली, ‘स्वाईन फ्लू झाल्यावर डॉ. नायडूमध्ये मला एकटीला राहायचे होते, त्यामुळे भीती वाटत होती. पहिले २ दिवस आईची खूप आठवण आली; पण तिसऱ्या दिवशी माझी मैत्रीण आल्यानंतर खूप मजा केली. हॉस्पिटलमध्ये आम्ही ५ ते ६ चित्रपट बघितले. खूप गेम खेळलो. नायडू हॉस्पिटलमधील डॉक्टरही खूप चांगले होते. ते कधीही ओरडले नाहीत. पहिल्यांदा गोळी गिळता यायची नाही मग ते बारीक करून पाण्यातून द्यायचे. डॉक्टरांनी सांगितलेल्या सगळ्या सूचना पाळल्या, आता मी छान बरी झाली आहे.’

मुक्ताची आई रुपाली वैद्य म्हणाल्या, ‘आम्हाला जेव्हा तिच्यामध्ये लक्षणे जाणवली तेव्हापासून आम्ही खबरदारी घेतली. डॉक्टरांकडे जाऊन निदान केले व औषधोपचारही लवकर सुरू केले. मुक्ता डॉ. नायडू रुग्णालयातून घरी आल्यानंतर ७ दिवस तिला कुठेही पाठवले नाही. आताही तिला मास्क घालूनच पाठवितो. योग्य खबरदारी घेतल्यास स्वाईन फ्लूला घाबरण्याचे कारण नाही.’

निकिता बर्वे म्हणाली, ‘‘डॉ. नायडूमध्ये एक दिवस एकटीलाच एका वॉर्डमध्ये ठेवले होते, त्या दिवशी आईची खूप आठवण आली, पण नंतर माझा भाऊ आणि मैत्रिणी आल्यानंतर खूप मजा केली.

खरं तर शाळा मला आवडत नाही, पण ७ दिवसांनंतर शाळेची खूप आठवण येत होती. शाळेत गेल्यावर सगळे जण काय केले, असे विचारायचे. आम्ही मजा केली, असे सांगितल्यावर फ्रेंड खूप हसायचे आणि त्यांना भीतीसुद्धा वाटायची.

## परततांना सर्वासाठी एक महत्वाचा संदेश

तुमची संस्था / कार्यालय, कर्मचारी वर्ग

व तुम्ही स्वत: सतर्क राहा.

वैयक्तिक व सामाजिक जबाबदारीची

जाणीव ठेवा

**काळजी घ्या, काळजी करु नका**

धन्यवाद

जिल्हारोग सर्वेक्षण कक्ष, आयडीएसपी,नांदेड

# श्री गुरु गोविंदसिंगजी स्मारक सामान्य रुग्णालय नांदेड येथिल संपर्क

## दूरध्वनी क्रमांक

- नियंत्रण कक्ष ०२४६२-२३४७५०
- रुग्ण तपासणी केंद्र ०२४६२-२३५३००